Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-2 | March-2015
Available online at www.isrj.org

# दलित आणि अदिवासी समाजाचा विकास आणि पंचवार्षिक योजना

भूषण पुंडलिक राजगुरू

संशोधक विद्यार्थी , अर्थशास्त्र सोलापूर विद्यापीठ सोलापूर .

**सारांश :** अनेक काळापासून ज्यांची लोकसंख्या जवळजवळ महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या एक चतुर्थांस आहे. अशा दलित आणि अदिवासी लोकांची सामाजिक आणि आर्थिक वंचना फार मोठया प्रमाणात झाली आहे. त्यांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्याच्या हेतून आणि त्यांच्या व समाजातील इतर लोकांच्या जीवनमानात असलेली दरी कमी करण्यासाठी आर्थिक योजनेच्या माध्यमातून सतत प्रयत्न केले जात आहेत. हे प्रयत्न जसे योजनेच्या माध्यमातून केले जात आहेत, तसेच योजनोच्या व्यतिरिक्त इतर मार्गाने देखील केले जात आहे.

**प्रस्तावना :**

पहिल्या तीन पंचवार्षिक योजनेच्या मध्यमातून त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याच्या हेतूने काही कल्याणकारी उपक्रम आखले गेले. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी असे दिसून आले की दीर्घकाळापर्यंत वंचित राहिलेल्या गटासाठी िवकास मानवी साधनांची प्रगती आणि आर्थिक प्रगती या दोन्हीच्या एकात्मिक विकासाचे धोरण राबविले पाहिजे. अशा धोरणामुळे या गटांना सर्वसामान्य लोकांच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामील होण्यासाठी स्वत:ची पात्रता निर्माण करता येईल्. पाचव्या आणि सहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यत अनुसूचित जाती व अनुसूचित जामाती यांच्या विकासासाठी लागणारा नधी सर्वसामान्य कल्याणनिधीमधून वळिवला जात असे. परंतु चौथा पंचवार्षिक योजनेनंतर या गटांच्यासाठी स्वतंत्र अशा खास योजनेची विकासासाठी आखलेली खास योजनेची संकल्पना तयार करण्यात आली. पाचव्या योजनेच्या अंतर्गत आदिवासींच्या विकासासाठी आखलेली खास योजना तसेच सहाव्या योजनेच्या अंतर्गत अनुसूचित जातींच्या विकासासाठी विशेष प्रकारची योजना आखल्यामुळे अनूसूचित जाती आणि जमातीच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी खास निधी उपलब्ध होण्याला मदत झाली . सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सर्वसामान्य लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या उपक्रमाबरोबरच प्रामुख्याने अनुसूचित जाती आणि

जमाती यांच्या हितासाठी खास योजना आखण्यावर भर देण्यात आला. सहाव्या योजनेमध्ये ५० टक्के आरक्षित जाती आाणि जमातीच्या कुटुंबियांना दारिद्र रेषेच्यावर आणण्याचे ध्येय निश्चित करण्यता आले होते. सातव्या योजनेमध्ये आरक्षित जाती आणि जमातीच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावर भर देण्यात आला. ज्यामुळे व्यवसायात बदल करणे शक्यत व्हावे आणि त्यांची आर्थिक कुवत वाढावी. आठव्या योजनेमध्ये विकासाच्या प्रक्रियेला आधिक गती देवून अनुसूचित जाती आणि जमाती आणि इतर समाज यांच्यामधील विकासाची दरी कमी करण्यावर भर देण्यात आला असे करण्याचा हेतू असा होता की, २० व्या शतकाच्या अखेरीस या वंचित समाजाला इतर समाजाच्याबरोबर सुधारणा करण्यावर भर देण्यात आला.

१९९१ मधील आर्थिक सुधारणानंतर या समाजाकडे पुन्हा काही प्रमाणात दुर्लक्षित झाले. त्यामुळे अनेक प्रकारची टीका भारत सरकार व योजना आयोगावर करण्यात आली. परंतु ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये सर्वसामावेश विकासावर भर देण्यात आला आहे. सामाजिक दृष्टया वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न् केले जात आहेत. मध्यंतरी काळात दारिद्ररेषेखालील लोकांच्या प्रमाणात हळूहळू घट झालेली आहे. परंतु ही घट होण्याचे प्रमाण वेगवेगळया सामाजिक गटात वेगवेगळे आहे. सर्वसामान्यपणे दारिद्ररेषेखालील लोकांचे प्रमाण घटण्याचा वेग अनुसूचित जाती आणि इतर जाती तुलनेत अनुसूचित जमातीमध्ये आधिक आहे.

महाराष्ट्रात १९८३ -८४ ते १९९३-९३ या काळात अनुसूचित जातीमधील गरिबी ५९.२२ टक्के वरून ५१.६४ झाली म्हणजे १२.७९ नी कमी झाली. अनुसूचित जमातीमधील गरिबी याकाळाता ६१.६८ वरून ५०.५८ टक्के पर्यंत कमी झाली. म्हणजेच १८ टक्क्यानी घटली. यावरून असे िदसून येते की , अनुसूचित जमातीमधील गरिबीची पातळी १९८३-८४ मध्ये म्हणजेच सुरूवातीला अनुसूचित जातीपेक्षा जास्त होती. परंतु त्यांच्यामधील गरिबी घटण्याचा वेग आधिक असल्यामुळे त्यांना अनुसूचित जमातीची गरिबीचा १९९३-९४ मध्ये अनुसूचित जातीपेक्षा व नवबौध्द यांच्या सरासरी गरिबीच्या पातळीशी तुलना केली तर अनुसूचित जमातींची परिस्थिती १९९३ -९४ मध्ये अनुसूचित जातीपेक्ष बरीच सुधारल्याचे दिसून येते.

अजून प्रगती होणे गरजेचे

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व जामातीच्या आर्थिक परिस्थितीची भारतीय समाजातील इतर गटांशी रोजगारांची परिस्थिती , जमिनीच्या मालकीची परिस्थिती , मोलमजुरी करणा-या लोकांचे प्रमाण, रोजगार आणि बेकारीची परिस्थिती , खर्चशक्ती आणि गरिबाचे प्रमाण या संदर्भातील मर्यादीत स्वरूपात उपलब्ध असलेली आकडेवारी अभ्यासल्यावर आपणास महाराष्ट्रातील ग्रामीण भागात काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे दिसते. परंतु तरीदेखील आजून खूप सुधारणा होणे गरजेचे आहे.

साक्षरतेच्या बाबतीत अनुसूचित जातीमध्ये १९६१ मध्ये १२.२ टक्के वरून १९९१ मध्ये ४० .०८ टक्के आणि अनुसूचित जमातीमध्ये ६.९टक्के वरून २६टक्के पर्यंत वाढ झाली, हे प्रगतीचे लक्षण आहे. अनुसूचित जाती व जामातीमधील सीमांत आणि अल्पभूधारक शेतकरी कुटुंबाच्या मालकीच्या जमिनीच्या क्षेत्रामध्ये थोडया प्रमाणात का होईन पण वाढ झाली आहे. अनुसूचित जातीतील बिगरशेती क्षेत्रातील रोजगाराच्या उपलब्धतेचे प्रमाण ब-याच प्रमाणात समाजातील इतर जातीच्या जवळपास जाऊन पोहचले आहे.

गरिबीची परिस्थितीदेखील अनुसूचित जातीच्यासंदर्भात १९८३ मधील ५९.२ टक्के वरून १९९३ मध्ये ५१.६४ टक्के पर्यंत कमी झाले. तसेच अनुसूचित जामातीच्या संदर्भात अनुक्रमे ६१.६८ टक्के वरून ५०.५८ टक्के पर्यंत कमी झाले.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या आकडेवारीवरून असेही स्पष्ट दिसून येते की, अनुसूचित जाती व जमाती आणि इतर समाजातील इतर गट यांच्यामध्ये उत्पन्न् मिळविण्यासाठी गरज असलेल्या मालमत्तेची आणि रोजगारांची उपलब्धता यासंदर्भात अजूनही असमानता दिसून येते. शेती क्षेत्रामधील विषमता सर्वाधिक असल्याची दिसून येते. १९९१ मध्ये अनुसूचित जातीच्या लोकांतील शेतीवर मजुरी करणा-या कामगारांचे प्रमाण इतर गटांच्या तुलनेने दुप्पट होते. परंतु स्वत:ची जमीन कसणा-या स्वावलंबी शेतक-यांच्या बाबतीत हे प्रमाण नेमके उलट होते. अशा त-हेने विचार केला तर गरिबीच्या पातळीच्या दृष्टीने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती भारतातील इतर समाजाच्या तुलनेत २० वर्षे मागे राहिलेल्या आहेत. यामध्ये सुधारणा करावयाची झाल्यास धोरणात्मक निर्णय राबविणे गरजेचे आहे.

संदर्भसूच

1. Parvathamma( 1984),Scheduled Castes and Tribes : A Socio-Economics Survey,Ashish,Dehli.
2.Economics Status of social groups in maharashtra emerging issues,in Sukhadeo Thorat,2001
3.Various National Sample Survey Report.
4. New Economics Policy and Its Impact on Employment and Poverty of Scheduled Castes in India, Occasional Paper( DSA),Pune (1996)